महाराष्ट्र शासन

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in    Email : ropune@dtemaharashtra.gov.in


जा.क्रः तंशिविकापु/आस्था-३(अ)/मभाषा/२०२४/4121    दिनांक : 14 OCT 2024

**परिपत्रक –**

**विषय- महाराष्ट्र राजभाषा अधिनियम व मराठी भाषा धोरणातील तरतूदीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीबाबत ---**

संदर्भ- मा.संचालक, मुंबई यांचे पत्र क्र. १६/संकीर्ण/मषाधो(राजभाषा)/२०२४/१७९, दिनांक ०३/१०/२०२४ .

उपरोक्त संदर्भाकिंत पत्राच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय संस्था यांना कळविण्यात येते की, मराठी भाषा विभागाचा दिनांक १४/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या नियम क्रमांक ९.८ मधील तरतूदीनुसार सर्व व्यवहार मराठी भाषेत करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

तसेच कार्यालयांमध्ये वापरण्यात यावयाच्या सर्व प्रमाणित नमुने, प्रपत्रे, नोंदवहया, जनसंवाद व जनहित यांच्याशी संबधित असणारे इतर कोणतेही दस्तऐवज मराठी भाषेत असणे आवश्यक आहे. सोबत संचालनालयाचे पत्राची प्रत जोडली आहे.

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घ्यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk१६@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : १६/संकीर्ण/मषाधो (राजभाषा)/२०२४/९७८ दिनांक: 0 3 ऑक्टोबर 2024

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर.

२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

विषय :- महाराष्ट्र राजभाषा अधिनियम व मराठी भाषा धोरणातील तरतूदीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्याबाबत..

संदर्भ:- १) मराठी भाषा विभागाचे पत्र क्र. भाषाधो-२०२४/प्र.क्र.८२ (भाग-२)/भाषा-२, दिनांक २६.०८.२०२४
२) मराठी भाषा विभागाचे पत्र क्र. भाषाधो-२०२४/प्र.क्र.८०/भाषा-२ (ई-८२७४९१), दिनांक २६.०८.२०२४
३) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. भाषाधो-२०१८/प्र.क्र.५०/भाषा-१, दिनांक १४.०३.२०२४

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ व त्यातील (सुधारणा) अधिनियम, २०१५ व २०२१ तसेच महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम, २०२२ यानुसार राज्य शासनाची सर्व कार्यालये यांच्या मार्फत "वर्जित प्रयोजने" वगळता सर्व सामान्य जनतेशी करण्यात येणारा सर्व प्रकारचा पत्रव्यवहार तसेच इतर सर्व कार्यालयीन कामकाज मराठी भाषेत करणे अनिवार्य आहे.

मराठी भाषा विभागाचे दिनांक १४.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या नियम क्र. ९.८ मधील तरतूदीनुसार पुढील तक्त्यात नमूद करण्यात आलेल्या आपल्या अधिनस्त कार्यालयांकडून केल्या जाणा-या दस्तऐवजांसह सर्व व्यवहार मराठी भाषेत प्राधान्याने करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

तसेच राज्य शासनाच्या कार्यालयांमध्ये वापरण्यात यावयाच्या सर्व प्रमाणित नमुने, प्रपत्रे, नोंदवहया, जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित असणारे इतर कोणतेही दस्तऐवज मराठी भाषेत असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम, २०२२ मधील नियम क्र. ३(१) मध्ये राज्य शासनाची मालकी असलेली, त्याचे नियंत्रण असलेली किंवा त्याने निधी पुरवठा केलेली वैधानिक महामंडळे, शासकीय, निमशासकीय कंपन्या किंवा कोणतेही प्राधिकरण यांच्या प्रशासकीय कामकाजातील मराठी भाषेच्या वापराची प्रयोजन निश्चित करण्यात आली आहे.

याअनुषंगाने आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय संस्थांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
- 9 OCT 2024
आवक क्र. 3060723

(डॉ. सुनिल भामरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय म. रा., मुंबई.

प्रत :- माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. ४,४-अ व १२ मु. का. मुंबई.

C:\Users\DESK१६\Desktop\R O LETTER.doc